


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १६ जानेवारी २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १०९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# तरसाच्या हल्ल्यात वैरागजवळच्या भालगावमध्ये रेडकू ठार

## बार्शी तालुक्यात अजून एका भितीचा शिरकाव

▸▸ मधील सोनवणे यांच्या रेडकुला संपवले

▸▸ वन खाते म्हणतेय-तरस उभ्या माणसावर हल्ला करत नाही घाबरू नका!

✔ बार्शी/प्रतिनिधी

बार्शी तालुक्यासह धाराशिवमधील येडशी-रामलिंग भागात धुमाकूळ घालणाऱ्या वाघा पकडण्यासाठी चंद्रपूरच्या वनखात्याची एक टीम आलीय म्हटल्यानंतर या भागातील शेतकऱ्यांनी सुस्कारा सोडला होता. मात्र तरस या हिंस्त्र प्राण्याचा शिरकाव या भागात झाला आहे. या तरसाने बार्शी तालुक्यातील वैराग भागातील भालगावमध्ये एका वस्तीवरच्या रेडकूवर हल्ला केला आहे. त्यामुळे या भागातील पशुधन पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

बार्शी तालुक्यात गोधन संपवणाऱ्या, उभ्या पिकांचे नुकसान करणाऱ्या वाघ बिबट्याला पकडण्यासाठी चंद्रपूरच्या वनाधिकाऱ्यांचे तुकडी डेरे दाखल झाली असताना, वैराग जवळच्या भालगाव येथे तरसाची एन्ट्री झाली आहे.

दिनांक १५ जानेवारीच्या पहाटे अंकुश दासा सोनवणे यांच्या शेतातील गोठ्यात असलेल्या रेडकुवर हल्ला करून



त्याला तरसाने संपवले आहे, ही माहिती मिळताच वैरागचे वन परिमंडळ अधिकारी व्ही.व्ही. शिदोडकर यांनी घटनास्थळाला भेट दिली व पाहणी केली.

या पाहणीनंतर शिदोडकर यांनी घटनास्थळापासून ५० मीटर अंतरावर आढळलेले ठसे हे तरसाच्या पावलाचे आहेत, असे सांगितले, तसेच तरस मृत जनावरे खातो किंवा लहान जनावरांवर हल्ला करतो. तरस उभ्या माणसावर हल्ला करत नाही अशी मल्लिनाथी केली आहे. वन्य प्राणी जीवनाचा अभ्यास करून शास्त्रीय असले तरीसुद्धा आता सध्या बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मनात या वाघ बिबट्या तरसाच्या धुमाकूळामुळे धडकी भरलेली आहे. त्यामुळे शेतातल्या गोठ्यांना तारेची जाळी बसवण्यापासून विविध उपाय शिदोडकर यांनी सुचवले असले तरी सध्या वाघाला पकडणे आवश्यक आहे.

### माहिती देण्याची गरज

चंद्रपूरची टीम मंगळवारी येडशी येथे दाखल झाली.वैराग येथील वन खात्याच्या कार्यालयातून सारी सूत्रे हलवली जात आहेत.येथील कर्मचारी या टीमला लोकेशन दाखवण्यात व्यस्त आहे.त्यामुळे दैनंदिन माहिती मिळत नाहीय.वनखात्याच्या वरिष्ठ कार्यालयाकडून रोजची माहिती प्रसार माध्यमांना मिळावी,अशी अपेक्षा आहे.

### गौडगावमध्येही हिंस्त्रप्राणी दिसला

भालगावमधील एका शेतातील रेडकूवर तरसाने हल्ला केल्याची बातमी पसरल्यानंतर वनखात्याकडून त्याचा शोध सुरू असतानाच गौडगाव भागातही असा हिंस्त्रप्राणी दिसल्याची तक्रार तेथील नागरिकांनी वनखात्याकडे केली पण सध्या वनखात्याची टीम चंद्रपूरहून आलेल्या पथकाला सहकार्य करण्यात मग्न आहे.त्यामुळे बुधवारी नागरिकांच्या तक्रारीची नोंद करून घेतली गेली.गुरूवारी वनखात्याचे कर्मचारी गौडभागाचा दौरा करणार आहेत.

# शोकाकूल वातावरणात महेश कोठे यांना अखेरचा निरोप



सोलापूर : माजी महापौर महेश कोठे यांच्यावर बुधवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी शोककूल कोठे परिवार.

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूरच्या राजकारणावर आपला स्वतंत्र ठसा उमटवून गेलेले माजी महापौर महेश कोठे यांना बुधवारी सोलापुरात हजारोंच्या जनसागराने साश्रू नयनांनी अखेरचा निरोप दिला. कोठे यांचे पुत्र माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांनी रात्री पार्थिवाला मुखाग्नी दिला. त्यावेळी कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले होते.**

अनेकांची कारकीर्द घडवलेल्या या लाडक्या नेत्याच्या अंत्यदर्शनासाठी शहरातील कानाकोपऱ्यांतून हजारो कार्यकर्त्यांची गर्दी झाली होती. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यात मकरसंक्रांतीनिमित्त शाहीस्नान करताना हृदयविकाराने महेश कोठे यांचे मंगळवारी सकाळी निधन झाले होते. त्यांचे पर्थिव प्रयागराज येथून बुधवारी पहाटे पुण्याला आणले जाणार होते आणि तेथून ते सोलापूरला आणले जाणार होते. परंतु प्रयागराज येथे दाट धुके पडल्याने विमानाचे उड्डाण होवू शकले नाही. रूग्णवाहिकेतून त्यांचे पार्थिव लखनऊ येथे आणले गेले.त्यानंतर बुधवारी दुपारी एकच्या सुमारास लखनऊ येथून एअर ॲम्बुलन्स त्यांचे पार्थिव घेवून सोलापूरकडे मार्गस्थ झाले. हे विमान दुपारी सव्वा चारच्या सुमारास सोलापूरच्या विमानतळावर उतरले. याप्रसंगी विमानतळावर खासदार प्रणिती शिंदे,डॉ.सूर्यप्रकाश कोठे, आ.देवेंद्र कोठे,प्रथमेश कोठे आणि कोठे परिवार उपस्थित होता. विमानतळाच्या बाहेर असंख्य कार्यकर्ते जमले होते.

फुलांनी सजवलेल्या रूग्णवाहिकेतून महेश कोठे यांचे पार्थिव पहिल्यांदा जुना विडी घरकूलमधील शिंदे प्रशालेत नेण्यात आले.तिथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. सकाळपासूनच येथे त्यांच्या हजारो समर्थकांनी गर्दी केली होती. असंख्य पुरूष-महिलांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यानंतर त्यांचे पार्थिव मुरारजी पेठमधील राधाश्री निवासस्थानात ठेवण्यात आले. तिथे विविध क्षेत्रातील मान्यवर, विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी अंत्यदर्शन घेतले. रात्री साडेआठच्या सुमारास फुलांनी सजवलेल्या टेम्पोमधून त्यांच्या अंत्ययात्रेला सुरूवात झाली. जुनी मिल चाळीतील कोठे यांचे जुने घर, सरस्वती चौक, शिवाजी प्रशाला, मेकॅनिकी चौक, पांजरापोळ चौक मार्गे ही अंत्ययात्रा जुना पुणे नाका येथे आली. त्यानंतर तेथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी काशी जगद्‌गुरु, डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी, खासदार प्रणिती शिंदे, आ. सुभाष देशमुख, आ. विजय देशमुख, माजी आमदार दिलीप माने, माजी आ. सिद्धाराम म्हेत्रे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, दै. सुराज्यचे संपादक राकेश टोळ्ये, भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, दिलीप कोल्हे, महेश गादेकर, चेतन नरोटे, सुरेश हसापुरे, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, प्रकाश यलगुलवार, सुधीर खरटमल, लक्ष्मण जाधव, देवेंद्र भंडारे, धर्मराज काडादी, आनंद चंदनशिवे, अमर पुदाले, पेंटप्पा गड्डम, राजू राठी, मोहन डांगरे, नसीमाताई पठाण, सुशीला आबुटे, किरण पाठक, दत्ता सुरवसे,मनीस सुरवसे, राजू सुरवसे, जगदीश पाटील, मनोहर सपाटे, बिज्जू प्रधाने, विक्रम देशमुख, केदार उंबरजे, अंबादास करगुळे, जय साळुंखे, माजी आमदार शिवशरण पाटील, डॉ. शिवरत्न शेटे, विशाल गायकवाड, रॉकी बंगाळे, काशिनाथ झाडबुके, जगदीश पाटील, अशोक निंबर्गी, राजकुमार हंचाटे, मधुकर आठवले, मेघनाथ येमुल, श्रीनिवास जोगी, व्यंकटेश कोंडी, बाळासाहेब शेळके, आरिफ शेख, तौफिक शेख, भूपती कमटम, पिंटप्पा गड्डम, मल्लिकार्जुन कमटम, अंबादास बिंगी, रामचंद्र जन्नू, सुरेश फलमारी, नरसैया इप्पाकायल, अशोक इंदापुरे, जनार्दन कारमपुरी कंदकटला स्वामी, सत्यनारायण बोल्ली, रामकृष्ण कोंड्याल, गणेश वानकर, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, अमोल शिंदे, पुरूषोत्तम बरडे, मनिष काळजे, मिलन कल्याणशेट्टी, नागेश वल्याळ,सलाम शेख, नितीश करवा यांच्यासह महेश कोठे यांचे मुंबई-पुण्यातील स्नेही यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि उपस्थित होते.

## मारहाण करून दाम्पत्याचे १ लाख ८० हजारांचे दागिने लुटले; घोटी येथील घटना

✔ टेंभुर्णी : दुचाकी वरून जात असताना दरोडेखोरांनी कोयत्याने पतीस मारहाण करून पत्नीच्या अंगावरील सोन्याचे दागिने आणि मोबाईल असा १ लाख ८० हजाराचा ऐवज लुटून पोबारा केला. हे घटना घोटी (ता.माढा) येथे येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली.

याप्रकरणी टेंभुर्णीच्या पोलिसांनी दुचाकीवरून आलेल्या चौघा अनोळखी चोरट्याविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात जखमी झालेले मच्छिंद्र संभाजी गळगुंडे (वय ४६ रा.घोटी ता. माढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते सोमवारी रात्री आपली पत्नी लक्ष्मी यांच्या सोबत दुचाकीवरून चांभार विहीर ते घोटी जाणारे रोडने घराकडे जात होते. त्यावेळी घोटी शिवारातील कच्च्या रोडवर पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांना वाटेत अडवले. आणि त्यांच्या दुचाकीला लाथ मारून खाली पाडले. त्यानंतर कोयत्याचा धाक दाखवून एकाने मच्छिंद्र गळगुंडे यांच्यावर हातावर कोयत्याने वार केला. आणि त्यांच्या पत्नीच्या अंगावरील ३० ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच मोबाईल याचा ऐवज लुटून पोबारा केला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास फौजदार सोनटक्के करीत आहेत.

## दुचाकी घसरल्याने तरूणाचा मृत्यू



✔ कुर्डुवाडी : कुर्डुवाडी - माढा रोडवर भोसरे गावच्या हद्दील अनेक वर्षापासून रखडलेल्या पुलाचे काम चालू आहे. त्याकामासाठी कचखडी टाकलेला ढिगारा न दिसल्याने दुचाकीवरील तरुण घसरून पडला. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला.

ही घटना घटना मंगळवारी रात्री १० वाजता घडली. संग्राम दत्तात्रय वरपे (वय २९, रा.निमगांव टें. ता.माढा) असे त्या तरुणाचे नाव आहे. संग्राम दत्तात्रय वरपे हा निमगांवहून कुर्डुवाडी मार्गे माढ्याकडे सासुरवाडीला मोटारसायकलवरुन जात होता. माढा रस्त्यावर भोसरे शिवारात अनेक वर्षापासून अर्धवट असलेल्या पुलाचे काम सध्या सुरु आहे. या पुलासाठी म्हणून कचखडी आणून टाकण्यात आली होती. कचखडीचा ढिगारा असलेल्या ठिकाणी सूचना फलक लावलेला नसल्याने मोटारसायकलवरील संग्राम दत्तात्रय वरपे याला याचा अंदाज आला नाही. तो मोटारसायकलसह ढिगाऱ्यावर जाऊन पडला.

यामध्ये तो गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाला. निलेश दत्तात्रय वरपे यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पतंगापेक्षा तरी बरं आहे!

कल्याण
**236-11-588**

मुंबई
**129-21-146**

# राज्यातील १४३ शासकीय औद्योगिक संस्थांना मिळाली नवी ओळख

■ कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली मान्यता

■ सोलापूर जिल्ह्यातील ४ संस्थांचे नामकरण

✔ सोलापूर/प्रतिनिधी

कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील १३२ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण यशस्वीपणे करण्यात आले आहे. प्रथम १४ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाद्वारे घेण्यात आला होता. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील ४ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील फक्त २ औद्योगिक संस्था सोडल्या तर इतर औद्योगिक संस्थांना या आधी कोणत्याही प्रकारची नावे नव्हती. त्यांनतर कौशल्य विकास विभागाद्वारे महाराष्ट्रातील शासकीय औद्योगिक संस्थांसाठी



नागरिकांकडून नावाबाबत सूचना मागवण्यात आल्या होत्या.

त्याप्रमाणे राज्यातील १३२ आयटीआयचे नामकरण करण्याचा निर्णय बुधवारी जाहीर करण्यात आला. त्यानुसार अकोला, अमरावती, कोल्हापूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, जालना, धाराशिव, धुळे, नंदुरबार, नागपूर, नांदेड, नाशिक, परभणी, बीड, बुलढाणा, भंडारा, मुंबई उपनगर, यवतमाळ, रत्नागिरी, रायगड, लातूर, वर्धा, वाशिम, सांगली, सातारा, सोलापूर आणि हिंगोली जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक संस्थांना नवीन ओळख मिळाली.

### नामकरण केलेल्या जिल्ह्यातील संस्था

- सोलापूर जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संसथा, अकलूज– परमवीर चक्र गवजेता मेजर सोमनाथ शर्मा शासकीय औद्योगगक प्रगशक्षण संसथा, अकलूज.
- शासकीय औद्योगिक प्रगशक्षण संसथा, करमाळा– मदनदास देवी शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्था, करमाळा
- शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोहोळ–परमवीर चक्र विजेते नाईक जादूनाथ सिंह शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोहोळ
- शासकीय शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सांगोला– परमवीर चक्र गवजेता लान्स नाईक करम सिंह शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सांगोला.

## वेल्डिंग करताना पडल्याने तरुणाचा मृत्यू

✔ सोलापूर : मार्केट यार्ड येथील कांदा शेडचे वेल्डिंग करताना तोल जाऊन पडल्याने तरूणाचा मृत्यू झाला. आयान रफिक हेब्बल (वय १७ वर्षे १० महिने, रा. किसान संकुल, अक्कलकोट रोड) असे या तरुणाचे नाव आहे. ही घटना १४ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी मोईन मोहमद हनीफ शेख (वय ४६, रा. ब्लॉक नं. १, रूम २ खतीब नगर, कोंडा नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. सिकंदर सैफन शेख (वय ३२, व्यवसाय वेल्डिंग कॉन्ट्रॅक्टर, रा. किसान नगर, अक्कलकोट रोड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. मोईन याचा भाचा आयान हेब्बल हा १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या असतानाही सिंकदर शेख हा त्याला मार्केट यार्ड येथील कांदा शेडचे वेल्डिंग कामास घेऊन गेला.

## पत्नीचा चाकूने खुनाचा प्रयत्न; पतीला पोलीस कोठडी

✔ बार्शी/प्रतिनिधी

पतीपासून विभक्त राहणाऱ्या २५ वर्षीय पत्नीचा चाकूने गळ्यावर वार करून खुनाचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना बार्शी येथील ताडसौंदणे रोडवरच्या मैदानात सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी बार्शी शहरच्या पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करून समाधान नवनाथ गायकवाड (वय ३० रा. बारलोणी ता.माढा) याला अटक करून ३ दिवसाची पोलीस कोठडी घेतली आहे.

भाग्यश्री समाधान गायकवाड (वय २५ सध्या रा.शेलगाव व्हळे,ता.बार्शी) असे जखमी विवाहितेचे नाव आहे. तिला उपचारासाठी गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले.

तिने यासंदर्भात बार्शी पोलिसात मंगळवारी फिर्याद दाखल केली. पतीबरोबर पटत नसल्याने भाग्यश्री गायकवाड ही गेल्या दोन वर्षापासून आपल्या मुलासोबत शेलगाव येथे माहेरी राहण्यास होती. ती सोमवारी रात्री आपल्या दुचाकी वरून शेलगाव येथे घराकडे निघाली होती. ताडसौंदणे बायपास रोडवरील कडबाकुट्टी जवळ आली असता तिचा पती समाधान गायकवाड हा वाटेत थांबलेला दिसला.

तिला बोलायचे आहे असे सांगितल्यानंतर ते दोघे दुचाकीवरून १ कि.मी. अंतरावर असलेल्या मोकळ्या जागेत जाऊन बोलत बसले होते. त्यावेळी समाधान याने तुला माझ्यासोबत नांदायचे नाही का? तू माझे वाटोळ केले. तुला मारूनच टाकतो असे म्हणत तिला खाली पाडून तिच्या गळ्यावर चाकूने वार करून गंभीर जखमी केले होते.